राज्य शिक्षक पुरस्काराचा शिक्षण विभागाला विसर

पुरस्कारांची प्रक्रिया न राबवल्याने दोन वर्षांचे पुरस्कार प्रलंबित

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोनाच्या प्रादुर्भावामुळे शिक्षण क्षेत्र विस्कळीत झालेले असताना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने करोना काळातही शिक्षक पुरस्काराची प्रक्रिया पूर्ण करून पुरस्कार जाहीर केले. मात्र राज्याच्या शिक्षण विभागाला राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचा विसर पडला असून, दोन वर्षांचे पुरस्कार प्रलंबित राहिले आहेत.

राज्याच्या शिक्षण विभागाकडून राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतात. त्यात प्रयोगशील आणि निष्ठेने काम करणाऱ्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचा सन्मान केला जातो. या पुरस्कारांसाठी शिक्षकांकडून प्रस्ताव मागवले जातात. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांची छाननी, मुलाखती आदी प्रक्रिया पार पाडून पुरस्कारप्राप्त शिक्षकांची नावे जाहीर केली जातात आणि शिक्षक दिनी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. मात्र करोना काळात ही प्रक्रियाच शिक्षण विभागाने राबवली नाही. त्यामुळे गेल्या वर्षीच्या आणि यंदाच्या अशा दोन वर्षांची प्रक्रिया प्रलंबित आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने करोना काळात प्रक्रियेमध्ये बदल करून शिक्षक पुरस्कारांची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवून पुरस्कार जाहीर केले, तर राज्याच्या शिक्षण विभागाला अडचण काय, करोना काळात शिक्षक अथकपणे काम करत असताना शिक्षण विभागाकडून शिक्षकांना पुरस्कारापासून वंचित का ठेवले जात आहे असे प्रश्नही उपस्थित करण्यात येत आहेत.

राज्याचा शिक्षण विभाग केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रक्रिया राबवत असेल, तर शिक्षण विभागाने शिक्षक पुरस्काराची प्रक्रिया पूर्ण करायला हवी. केंद्र सरकारने करोना काळात ऑनलाइन पद्धतीने प्रक्रिया राबवून ऑनलाइन पद्धतीनेच पुरस्कारही प्रदान केले. त्याच धर्तीवर राज्याच्या शिक्षण विभागानेही ऑनलाइन प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे एक वेळ पुरस्कारांचे प्रत्यक्ष वितरण नाही केले तरी चालेल, पण किमान पुरस्कारांची प्रक्रिया पूर्ण करून ते जाहीर झाले पाहिजेत. तसेच काही जिल्हा परिषदांनीही जिल्हा शिक्षक पुरस्काराची प्रक्रिया राबवली आहे, तर शिक्षण विभागाला प्रक्रिया राबवण्यात अडचण काय, असा प्रश्न राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षक विक्रम अडसूळ यांनी उपस्थित केला.

> राज्य शिक्षक पुरस्काराची प्रक्रिया राबवण्याबाबत शिक्षण विभागाकडून कोणत्याही प्रकारच्या सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.
>
> – दत्तात्रय जगताप, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक

> राज्य शिक्षक पुरस्कारांची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवणे शिक्षण विभागाला सहजच शक्य होते. करोना काळात राज्यातील शिक्षकांनी चाकोरीबाहेर जाऊन अध्यापनामध्ये अनेक प्रयोग केले आहेत. ऑनलाइन शिक्षणातील प्रयोगांसह विद्यार्थ्यांची सुरक्षितता बाळगून त्यांच्या घरी जाऊनही शिकवले आहे. अशा शिक्षकांना प्रोत्साहन म्हणून शिक्षक पुरस्कार महत्त्वाचे असतात. पण शिक्षक पुरस्काराची प्रक्रिया दोन वर्षे न राबवण्यामागे राज्याच्या शिक्षण विभागाची अनास्था कारणीभूत आहे का, असा प्रश्न पडतो.
>
> – डॉ. वसंत काळपांडे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

युवतीवर सामूहिक बलात्कार; चौघे गजाआड

नियंत्रण कक्षाला माहिती मिळाल्यानंतर त्वरित कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : युवतीवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली. एका घरात डांबून ठेवलेल्या युवतीच्या रडण्याचा आवाज नागरिकांनी ऐकल्यानंतर याबाबतची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. पोलिसांनी त्वरित कारवाई करून आरोपींच्या तावडीतून तिला सोडवले आणि चौघांना अटक केली.

श्रीकांत सुरेश सरोदे (वय ३६), आदित्य सुरेश पवार (वय १९), दुर्वेश संतोष जाधव (वय ३६), आशिष राकेश मोहिते (वय १८) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. शुक्रवारी सायंकाळी एका घरात युवतीला डांबून ठेवून तिच्यावर आरोपींनी बलात्कार केला. युवतीचा रडण्याचा आवाज शेजाऱ्यांनी ऐकला. त्यांनी याबाबतची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला दिली. पोलिसांनी तातडीने दाट वस्तीच्या भागात शोध मोहीम राबवून घर शोधून काढले. युवतीला ताब्यात घेऊन तिला धीर देण्यात आला. पसार झालेल्या चौघांना पकडण्यात आले. आरोपी सरोदे सराइत असून त्याच्या विरोधात खून, जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णा इंदलकर, गुन्हे शाखेतील निरीक्षक विजय खोमणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वप्नील लोहार, हवालदार कुंदन शिंदे, राजू जाधव, गणेश कळसकर, अमोल झणझणे यांनी ही कारवाई केली.

महापालिकेच्या रुग्णालयांमधील लसीकरण आज बंद

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहरातील महापालिकेच्या रुग्णालयांमधील लसीकरण रविवारी (२९ ऑगस्ट) बंद राहणार आहे. महापालिकेच्या रुग्णालयांतील लसीकरण केंद्रे बंद राहणार असली, तरी खासगी रुग्णालयांमधील लसीकरण नियमित सुरू राहणार आहे. महापालिका प्रशासनाने याबाबत माहिती दिली. लशींचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने शनिवारी देखील महापालिकेच्या रुग्णालयांमधील लसीकरण केंद्रे बंद ठेवण्यात आली होती. लशींचा पुरेसा साठा उपलब्ध झाल्यास सोमवारी (३० ऑगस्ट) महापालिका रुग्णालयांतील नियमित लसीकरण सुरू राहील, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

यशवंत टापरे यांचे निधन



पुणे : बजाज टेम्पो कंपनीतील सेवानिवृत्त देखभाल विभागाचे प्रमुख यशवंत हरी टापरे (वय ८६) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे मुलगा, मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. बजाज टेम्पो कंपनीमध्ये त्यांनी २३ वर्षे देखभाल विभाग प्रमुख म्हणून काम केले होते.

वारजे भागात एटीएममधून बॅटरी चोरीस

पुणे : वारजे भागातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये शिरलेल्या चोरट्यांनी सहा बॅटरी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याबाबत स्टेट बँक ऑफ इंडियातील व्यवस्थापकांनी वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वारजे भागातील करण प्लाझा इमारतीच्या आवारात हे एटीएम आहे.

aSREC (India) Limited

बिल्डींग क्र. 2, युनिट क्र. 201-202ए आणि 200-202बी, तळ मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400093

मागणी सूचना प्रकाशन
(सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनु. 13(2) अंतर्गत सूचना)

श्री शंकर भीमराव सोमवंशी (मे. श्रीयश इंजिनिअर्स चे प्रोप्रा.)
नोंद. कार्यालय/ व्यवसायाचा पत्ता: गट क्र.1609, शेलार वस्ती, देहू आळंदी रोड, चिखली, पुणे - 412 114.
फॅक्टरीचा पत्ता: श्रीयश इंजिनिअर्स, प्लॉट क्र. सी-220, कोंडी बी बी धारफळ रोड, थरमॅक्सजवळ, एमआयडीसी, चिंचोली काटी, तालुका मोहोळ, जिल्हा सोलापूर - 413255.
श्रीयश इंजिनिअर्स:- प्लॉट क्र. ए-34/3, लोणी देवकर, एमआयडीसी, इंदापूर, पुणे - 413106.

दि. 25.03.2021 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये भारत को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई या मूळ धनकोने मे. श्रीयश इंजिनिअर्स च्या वित्तीय मत्ता सर्व हक्क, मालकी हक्क व हितसंबंध आणि अंतर्निहित सुरक्षा हितासह अपरिवर्तनीयपणे ॲसरेक (इंडिया) लि. यांना हस्तांतरित केलेले आहेत. परिणामी, सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 5 च्या अनुषंगाने ॲसरेक (इंडिया) लि. हे मे. श्रीयश इंजिनिअर्स चे सुरक्षित धनको झालेले आहेत आणि त्यांना आता कर्जदार / जामीनदार / गहाणकार यांचेकडून थकबाकीची वसुली करण्याचा आणि आपल्या स्वतःच्या नावे वसुली प्रक्रिया चालविण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. ॲसरेक (इंडिया) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटेरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीतखाली वर्णन केलेल्या कर्जदारांना आणि त्यांचे गहाणकार व जामीनदार यांना (एकत्रितपणे कर्जदार असा उल्लेख करण्यात येईल) दि. 26 जुलै, 2021 रोजी मागणी सूचना संदर्भ क्र. ASREC/MUM-II/SARFAESI/1239/2021-22 पाठविली जीमध्ये त्यांना संयुक्तपणे आणि अनेक प्रकारे त्यांना पाठविण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या आणि तसेच खाली देण्यात आलेल्या थकबाकी रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याशिवाय, सर्व/काही सूचना तशाच परत आल्याने किंवा प्रेषितीना सूचना प्राप्त झाल्याची पुष्टी अजूनही प्रलंबित असल्याने पर्यायी सूचना म्हणून सदर कर्जदारांना सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत ॲसरेक (इंडिया) लि. यांना संयुक्तपणे आणि अनेक प्रकारे कर्ज करारांतर्गत आणि कर्जदाराने निष्पादित केलेल्या इतर दस्तावेज/ लिखाणांसह वाचण्यात येणाऱ्या कर्ज करारांतर्गत देय असलेल्या खाली नमूद रकमांचा खाली नमूद दिनांकापासून ते भरणा व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या पुढील लागू रकमांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. संपूर्ण थकबाकी कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून सदर कर्जदाराने ॲसरेक (इंडिया) लि.कडे पुढील मत्ता तारण म्हणून ठेवलेल्या आहेत.

कर्ज क्र.	कर्जदार / जामीनदाराचे नाव	मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम
1. 004413100000081 2. 004433510000370 3. 00443360000389 4. 004433510000158 5. 004434010000125	मे. श्रीयश इंजिनिअर्स प्रोप्रा. शंकर बी. सोमवंशी	26.07.2021, 25.07.2021 नुसार रु. 8,75,83,860.16 (रुपये आठ कोटी पंच्याहत्तर लक्ष त्र्याऐंशी हजार आठशे साठ आणि सोळा पैसे फक्त) अधिक करारातील दराने पुढील व्याज.

अनामत मत्तांचे वर्णन

1) कंपनीचे स्टॉक, पुस्तकी कर्जे आणि इतर चालू मत्तांचे नजरगहाण.
2) शंकर भीमराव सोमवंशी यांचे मालकीचा प्लॉट क्र. सी-220, प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ 11781 चौ.मी., थरमॅक्सजवळ, कोंडी बी बी धारफळ रोड,एमआयडीसी, चिंचोली काटी, तालुका मोहोळ, जिल्हा सोलापूर - 413255. चतुःसीमाः पूर्वेस - बी बी धारफळ ते कोंडी रोड, पश्चिमेस - प्लॉट क्र. सी-172 ते सी-173, उत्तरेस - प्लॉट क्र. सी-221, दक्षिणेस - प्लॉट क्र. सी-219.
3) प्लॉट क्र. 4, क्षेत्रफळ 2300 चौ.मी., गट क्र. 312/5, 312/6, 312/7, 312/1 (जुना गट क्र. 2475), बॉश इंडिया लि. जवळ, पुणे - नाशिक हायवेसमोर, नाणेकरवाडी (चाकण), तालुका खेड, पुणे

गट क्र. -	312/5	312/6	312/7	312/1
चौ.मी. -	488.04	496.70	791.01	524.25

मालक शंकर भीमराव सोमवंशी. चतुःसीमाः पूर्वेस - गट क्र. 312 ची उर्वरित मालमत्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. 03 ची मालमत्ता, उत्तरेस - 12 मी. चा अंतर्गत रस्ता, दक्षिणेस - गट क्र. 312 ची उर्वरित मालमत्ता.
4) शंकर सोमवंशी यांचे मालकीची सदनिका क्र. 4, क्षेत्रफळ सुमारे 820 चौ.फू. बिल्ट-अप, स्टील्ट मजला, साई निवास - ए, प्लॉट क्र. 112, चिखली, पूर्णा नगर, ता. हवेली, पुणे - 411019. चतुःसीमाः पूर्वेस - प्लॉट क्र. 113, पश्चिमेस - प्लॉट क्र. 112-ए, उत्तरेस - एमआयडीसी हद्द, दक्षिणेस - 12 मी. रुंद रस्ता.

याद्वारे आपणांस सूचना देण्यात येते आणि आपले लक्ष सिक्युरिटी इंटेरेस्ट (एनफोर्समेंट) (दुरुस्ती) रुल्स, 2002 मधील नियम 3(5)सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटेरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनुच्छेद 13(8) कडे वेधण्यात येते ज्यानुसार आपण अनामत मत्तेच्या भाडेपट्टी, अभिहस्तांकन किंवा विक्रीच्या योगे जाहीर निविदा मागवून किंवा खाजगी वाटाघाटीद्वारे किंवा दरपत्रके मागवून विक्री/लिलावासाठी सूचना प्रकाशित करण्याच्या दिनांकाअगोदर कोणत्याही वेळी आम्ही म्हणजे सुरक्षित धनकोस घेणे असलेल्या रकमेची आम्हास आलेल्या सर्व खर्च, शुल्के व अधिभारांसह परतफेड करू शकता. कृपया हेही लक्षात घ्यावे की वर नमूद केल्याप्रमाणे अनामत मत्तेच्या भाडेपट्टी, अभिहस्तांकन किंवा विक्रीच्या योगे जाहीर निविदा मागवून किंवा खाजगी वाटाघाटीद्वारे किंवा दरपत्रके मागवून विक्री/लिलावासाठी सूचना प्रकाशित करण्याच्या दिनांकाअगोदर थकबाकी रकमेचा सुरक्षित धनकोस आलेल्या खर्च, शुल्के व अधिभारांसह भरणा न केल्यास आपल्याला सदर अनामत मत्ता यापुढे सोडवून घेता येणार नाही. कृपया लक्षात घ्यावे की आपण प्रकाशनाच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत थकबाकीचा भरणा न केल्यास आम्ही म्हणजे सुरक्षित धनको सदर अधिनियमांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करू आणि अनामत मत्तांची विक्री करून प्राप्त होणाऱ्या रकमेत संपूर्ण थकबाकीची वसुली न झाल्यास आम्हाला आपल्याकडून उर्वरित थकबाकीची वसुली करण्यासाठी नाईलाजाने न्यायालय/कर्ज वसुली न्यायाधीकरणामध्ये आपल्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करावी लागेल.
सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(13) नुसार आपणांस येथे नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही अनामत मत्तेचे विक्री, भाडेपट्टी किंवा इतर मार्गाने हस्तांतर करण्यास, तिची विल्हेवाट लावण्यास मनाई करण्यात येत असून सदर तरतुदीचे उल्लंघन करणे हे सर्फेसी अधिनियमांतर्गत दंडनीय गुन्हा आहे.

स्वा/-
दिनांक: 26.07.2021 — प्राधिकृत अधिकारी, ॲसरेक (इंडिया) लि.
स्थान: मुंबई — (ॲसरेक पीएस 12/2020-21 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

परीसमापन सूचना
आदित्य पॉलिमर्स अँड केमिकल्स(इंडिया) प्रा. लि. (परीसमापनामधील)

एचएसआयआयडीसी सेक्टर 5, आयएमटी मानेसर, गुरुग्राम प्लॉट क्र. 33 आणि 34 - जमीन क्षेत्रफळ 8100 चौ. मी.* येथील व्यावसायिक मालमत्ता
बांधकाम केलेले क्षेत्रफळ : (तळघर+ जीआर+ 2 मजले) = 7473.80 चौ. मी.*
[राखीव मूल्य : रु. 28 कोटी]

सर्व ईओआय/ बोली ह्या प्रोसेस मेमोरँडम दिनांकित 29 ऑगस्ट 2021 च्या आधारे असतील. माहिती साठी भेट द्या: http://kscadvisory.in/aditya-polymers.html
ईओआय आणि इच्छेच्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक : 3 सप्टेंबर 2021.
सर्व पत्रव्यवहार krishna@sphereadvisory.com ह्यांच्याशी करावा. प्रत्यक्ष येऊन चौकशी करू नये किंवा फोन कॉल्सचा विचार केला जाणार नाही.

*सर्व क्षेत्रफळ नोंदीवर आधारित देण्यात आली आहेत आणि मोजमाप घेतलेले नाही.

कृष्ण चामडीया, परीसमापक
आदित्य पॉलिमर्स अँड केमिकल्स (इंडिया) प्रा. लि. (परीसमापनामधील)
(आयबीबीआय नोंद. क्र. : आयबीबीआय/आयपीए-001/आयपी-पी00694/2017-2018/11220)
ई-मेल : krishna@sphereadvisory.com

दिनांक: 29 ऑगस्ट 2021

MANAPPURAM HOME FINANCE LTD.

मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.

CIN: U65923KL2010PLC039179
नोंद. कार्यालय: IV/470ए (जुना) W/638 (नवीन) मनप्पुरम हाऊस, वालापड थ्रीस्सूर, केरळ 680567
कॉर्पो. कार्यालय: मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्र. 301 ते 315, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-400093, महाराष्ट्र.
फोन क्र. 022-66211000, ईमेल: www.manappuramhomefin.com

शुद्धिपत्रक

सदर वर्तमानपत्रात दि. 23/08/2021 रोजी प्रकाशित नियम 9 सह वाचण्यात येणाऱ्या सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनु. 13/4 अंतर्गत ताबा सूचनेत असे म्हणण्यात आले आहे की "निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 9 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे". यात "प्रत्यक्ष ताबा" च्या ऐवजी "सांकेतिक ताबा" असे वाचण्यात यावे. सूचनेतील इतर तपशिलामध्ये काहीही बदल नाही.

स्वा/-
स्थान: पुणे — प्राधिकृत अधिकारी,
दिनांक: 29/08/2021 — मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

मत्तेची ऑनलाईन ई-निविदा विक्री

kotak कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड - 400051
शाखा कार्यालयः न्याती युनीट्री, चौथा मजला, झोन-II, पुणे-नगर हायवे, येरवडा, पुणे - 411006

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटेरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(5) अंतर्गत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटेरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या अचल मत्तांचा कोटक महिंद्रा बँक लिमिटेड म्हणजे सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि. 29/01/2020 रोजी ताबा घेतलेला असून तिची श्री उदयकांत भगवानदास सुराणा, श्रीमती कल्पना उदयकांत सुराणा आणि श्री रौनक उदयकांत सुराणा यांचेकडून सुरक्षित धनको कोटक महिंद्रा बँक लिमिटेड यांना कर्ज खाते क्र. पीआर00361052 अंतर्गत दि. 21/01/2021 रोजीनुसार घेणे असलेल्या रु. 97,20,307/- (रुपये सत्याण्णव लक्ष वीस हजार तीनशे सात फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या करारातील दराने लागू व्याजाच्या वसुलीसाठी दि. दि. 03/03/2021 रोजी दु. 12.00 ते 01.00 वाजेपर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह "जशी आहे, जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत रु. 1,17,00,000/- (रुपये एक कोटी सतरा लक्ष फक्त) आणि बयाणा रक्कम रु. 11,70,000/- (रुपये अकरा लक्ष सत्तर हजार फक्त) असेल आणि केवायसीसह बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 02/03/2021 रोजी सायं. 7:00 वाजेपर्यंत (भाप्रवे).
मालमत्तेचे वर्णन: सदनिका क्र. 102, पहिला मजला, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी "अमलताश" बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वूड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे. सदनिका क्र. 201, दुसरा मजला, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी "अमलताश" बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वूड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे. सदनिका क्र. 301, तिसरा मजला, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी "अमलताश" बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वूड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे. अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते. कर्जदार आणि सर्व लोकांनी लक्षात घ्यावे की कुठल्याही कारणास्तव सदर लिलाव अयशस्वी झाल्यास सुरक्षित धनकोस खाजगी तहाद्वारे अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार असेल. विक्रीसाठी काढण्यात आलेल्या मत्तांच्या संदर्भात काही खुलासा/आवश्यकता असल्यास बोलीदारांनी कृपया राजेंद्र दहिया (+91 8448264515), श्री आकाश सक्सेना (+91 8860001910), श्री पंकज राय (+91 7768003567) आणि प्रियांका अगरवाल (+91 9850527020) यांचेशी संपर्क साधावा. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कोटक महिंद्रा बँकची वेबसाईट म्हणजे https://www.kotak.com येथे दिलेली लिंक https://www.kotak.com/en/bankauctions.html आणि/किंवा https://kotakbank.auctiontiger.net पहावे.

स्थान: पुणे — दिनांक: 28.01.2021 — प्राधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

FEDERAL BANK
YOUR PERFECT BANKING PARTNER

PUNE/ DHANKAWADI BRANCH
GOLD LOAN – SALE NOTICE

Notice is hereby given for the information of all concerned and public in general that Gold Ornaments pledged with Dhankawadi branch of THE FEDERAL BANK LTD, in the undermentioned Gold Loan Account which was/were overdue for redemption and which has/have not been renewed so far in spite of repeated notices, will be sold by private sale if it is not closed on or before 05-09-2021

List of accounts;

15026100072170	Gangadhar Bapurao Wagalgave
15026100053253	Anil Shinde
15026100062031	Ashok Bhimrao Narsinge
15026100069531	Sanket Satish Pandit
15026100068301	Amit Rajan Jadhav
15026100075066	Amit Rajan Jadhav
15026100071388	Amit Rajan Jadhav
15026100068293	Amit Rajan Jadhav
15026100068251	Sameer Dattatray Suryawanshi
15026100068863	Gandupalli Kamalakar
15026100068913	Koushal George
15026100068939	Yogesh Sanjay Gujar
15026100069242	Omprakash Lalaram Unecha
15026100069283	Ganesh Shivaji Bhosale
15026100069333	Nilesh Shantaram Khatpe

प्रपत्र अ
जाहीर घोषणा
(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) नियम, 2016 मधील नियम 6 अंतर्गत)
'श्री साईकृपा शुगर अँण्ड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड'च्या धेणेकऱ्यांनी लक्ष द्यावे

संबंधित तपशील

1.	कॉर्पोरेट देणेकऱ्याचे नाव	श्री साईकृपा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड
2.	कॉर्पोरेट देणेकऱ्याच्या स्थापनेचा दिनांक	16/12/1998
3.	ज्यांचे अंतर्गत कॉर्पोरेट देणेकरी नोंदणीकृत आहे त्या प्राधिकरणाचे नाव	निबंधक, पुणे
4.	कॉर्पोरेट देणेकऱ्याचा कॉर्पोरेट ओळख क्र.	U15424PN1998PLC013139
5.	कॉर्पोरेट देणेकऱ्याच्या नोंदणीकृत कार्यालयाचा व मुख्य कार्यालयाचा पत्ता	दुकान क्र. 6, अण्णासाहेब मगर भवन, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे, महाराष्ट्र-411037, भारत
6.	कॉर्पोरेट देणेकऱ्याच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	28/08/2021 'आयआरपी'चा आदेश प्राप्त होण्याचा दिनांक 03/08/2021-आदेश जाहीर करण्याचा दिनांक
7.	नादारी निराकरण प्रक्रिया समाप्त होण्याचा अंदाजे दिनांक	प्रक्रिया सुरु होण्याच्या दिनांकापासून 180 दिवस
8.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव व नोंदणी क्रमांक	हर्षद शामकांत देशपांडे, नोंदणी क्र. IBBI/IPA-001/ IP-P-00166/2017-18/10335
9.	अंतरिम ठराव व्यावसायिकाचा बोर्डाकडे नोंदणी असलेला पत्ता व ई-मेल	403, कुमार मिलेनियम, जयभवानी नगर, पौड रोड, रेहन कॉर्नरजवळ, कोथरूड, पुणे-411038. ईमेल आयडी: harshad.de@hotmail.com
10.	अंतरिम निराकरण व्यावसायिकाशी पत्रव्यवहार करण्यासाठी वापरावयाचा पत्ता व ईमेल	हर्षद एस देशपांडे अँड असोसिएट्स, कॉस्ट अकाऊन्टन्ट्स,403, कुमार मिलेनियम, जयभवानीनगर, पौड रोड, रेहन कॉर्नरजवळ, कोथरूड, पुणे-411038. ईमेल आयडी: hsdasso@gmail.com
11.	दावे सादर करण्याचा शेवटचा दिनांक	11/09/2021
12.	अंतरिम ठराव व्यावसायिकाने निश्चित केलेले सेक्टर 21 मधील उप-विभाग (6अ)च्या कलम (ब) अंतर्गत धेणेकऱ्यांचे वर्ग	खाते पुस्तकांची पडताळणी केल्यावर ठरविण्यात येईल
13.	एखाद्या वर्गातील धेणेकऱ्यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहणारे म्हणून ओळख असलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
14.	(अ) संबंधित प्रपत्रे आणि (ब) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत	https://www.ibbi.gov.in/home/downloads प्रत्यक्ष पत्ता: प्रवेशिका क्र. 10 वर नमूद केल्यानुसार

याद्वारे सूचित करण्यात येते की राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाने दि. 28/08/2021 रोजी श्री साईकृपा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड यांची कॉर्पोरेट निराकरण प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले.
याद्वारे 'श्री साईकृपा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड'च्या धेणेकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी दि. 11/09/2021 पर्यंत पुराव्यांसह आपले दावे प्रवेशिका क्र. 10 वर नमूद पत्त्यावर अंतरिम निराकरण व्यावसायिकाकडे सादर करावेत.
वित्तीय धेणेकऱ्यांनी पुराव्यांसह आपले दावे केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावेत. इतर सर्व धेणेकऱ्यांनी पुराव्यांसह आपले दावे टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावेत.
खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकतो.

दिनांक: 28/08/2021 — सीएमए हर्षद देशपांडे
स्थान: पुणे — अंतरिम निराकरण व्यावसायिक

CSB Bank

PUBLIC NOTICE ON AUCTION OF PLEDGED GOLD ORNAMENTS

The borrower/s in specific and interested bidders in general are hereby informed that on account of non-repayment of Bank's dues by the borrowers as under despite the payment notice and recall/auction notice issued by the Bank, the gold ornaments pledged with the bank as security by the respective borrowers for the loans availed by them will be sold in public auction on "as is where is" and "non- recourse" basis through e-auction portal http://csbgold.auctiontiger.net on 3rd September, 2021 at 03:00 p.m . The auction may be adjourned to any other later date at the discretion of the bank upon publication of the same in the Bank's notice board. The borrowers are hereby further informed that the gold ornaments will be disposed off by private sale if the public auction is not successful and if there is a further balance to be recovered thereafter, legal action will be initiated against the borrower/s for recovery of the balance amounts due to the bank.

S.No.	Branch Name	Account Name	Client ID	No of Acc.	Bal Outstanding as on 26-08-2021	Weight (grams)
1	Ramwadi	AYODHA DEVI	7269323	3	1472680.27	382.9
2	Ramwadi	Gautam Arjun More	4222623	1	97810.75	23.2
3	Ramwadi	HEMENDRA NEMICHAND VERMA	7262320	3	1866507.68	480
4	Ramwadi	HENRY DADA PATOLE	1220971	1	342784.75	86
5	Ramwadi	KSHIRSAGAR SAKHAHARI GANPAT	3351746	1	63678.75	18
6	Ramwadi	MARYKUTTY M	3372764	1	36697.75	8.5
7	Ramwadi	Minakshi Devendrappa Pujari	4234743	1	104352.75	25.1
8	Ramwadi	NEETU SURESH PANDE	3414656	1	218403.75	51
9	Ramwadi	Nitinkumar Dadabhu Alhat	4224041	1	184696.84	45.1
10	Ramwadi	RAJESH SHIVARAMAN NAIR	3186720	1	61731.75	20
11	Ramwadi	RAMESH SAKHARAM MAGAR	3854213	1	254253.75	85
12	Ramwadi	ROSHAN VISHNU KOLI	4196061	1	166283.75	40
13	Ramwadi	Somnath Balkrushna Mahadik	4213873	1	46852.75	13
14	Ramwadi	TUSHAR GORAKH GAIKWAD	4172680	1	114643.75	27
15	Ramwadi	VISHAL KUNDALIK SAKATE	4216493	1	102339.75	25
16	Varkute	DADARAM PANDURANG RAJGURU	7154917	2	463222.5	129.71
17	Varkute	SUHAS KHANDU HEGADE	4167451	1	95882.75	23.5
18	MARKET YARD PUNE	ANURADHA SURESH DHUMAL	4232385	1	74038.75	20.5
19	MARKET YARD PUNE	GOPICHAND KISAN SAKUNDE	4237673	1	153640.75	39.5
20	MARKET YARD PUNE	KUNAL SHRIRANG	4144108	1	331609.75	88.8
21	MARKET YARD PUNE	MAHADEO MANIK MULE	7270996	1	353806.17	94
22	MARKET YARD PUNE	MALLIKARJUN R SAWALE	7283773	1	152420.75	41.3
23	MARKET YARD PUNE	MOHAN BHAGIWAN JADHAV	4237639	1	159106.75	45.5
24	MARKET YARD PUNE	SACHIN VISHNU DHUMAL	7270188	1	44126.75	12
25	MARKET YARD PUNE	SAGAR KASHINATH JOGI	4235660	1	36719.75	9.5
26	MARKET YARD PUNE	SURESH DATTATRAYA PAWALE	7308540	2	474755.5	122.6
27	MARKET YARD PUNE	UTKARSH ABASAHEB NILANGEKAR	7279036	1	120834.75	31.8
28	Sadesatranali	RAHUL VIJAY DIXIT	7285475	2	127228.5	30.96
29	Sadesatranali	SAGAR VISHNU MANE	7276269	1	54588.75	13.57
30	Sadesatranali	SARATH RAJ K	7311128	2	267989.5	68.17
31	Sadesatranali	SHIVAJI VISHWANATH PAWAR	7308784	1	750975.54	186.91
32	Sadesatranali	SURESH KUMAR HANSARAM RATHOD	4097676	2	616807.71	157.31
33	Sadesatranali	VIKRAM SURESH SALVI	7276688	2	918370.09	228
34	Pimpri	AMEY DATTATRAYA PAWAR	7286056	1	301817.75	75
35	Pimpri	KHANDU BABURAO JAMBHULKAR	4207686	1	223582.75	54.5
36	Pimpri	ROHIT SOMNATH VADAK DESHMUKHA	4241121	1	228399.75	58.5
37	Pimpri	SAGAR KALURAM BHOIR	4201526	3	316814.75	79

For more details/account wise information borrowers/interested bidders may contact respective branches and for participating in the auction, please visit/login to the e-auction portal http://csbgold.auctiontiger.net

Authorised Officer
CSB Bank

PUNE | AUGUST 29, 2021

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

क्षेत्रिय कार्यालय II :
३रा मजला, भारती विद्यापीठ भवन, एलबीएस रोड, पुणे-४११०३०

ई- लिलाव सूचना

स्थावर मालमत्तांची विक्री सूचना – सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ चे रुल्स् ८ (६) आणि ९ अंतर्गत स्थावर मालमत्तांसाठी ई-लिलावाने (ऑनलाईन ऑक्शन) विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल असेट्स् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रुल्स् २००२ अंतर्गत ताबा घेतलेल्या येथे वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांची नोटीस देऊन खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार जाहीर ई-लिलावाने विक्री करण्यात येत आहे. ई-लिलाव सेवापुरवठादार **मे. कॅनबँक कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेड (सीसीएसएल)** मार्फत वेबसाईट **https://www.indianbankseauction.com** द्वारे होईल.

१	सुरक्षित धनकोचा नाव व पत्ता	**कॅनरा बँक, बारामती शाखा**
२	कर्जदाराचे नाव आणि पत्ता	**मे. लिलाज् फुड ॲन्ड बेव्हरेजेस्, कु. माधुरी प्रमोद वाळींबे,** जमीनीचा प्लॉट व फॅक्टरी बिल्डींग, सीटीएस नं. ८७, चिखली फाट्याजवळ, ऑफ बारामती-इंदापूर रोड, लासुर्णे, ता. इंदापूर, पुणे-४१३११७.
३	एकूण येणे रक्कम दि. ०२/०३/२०१७ रोजी	टर्म लोन रु. ४८,३३,२७०.०० (दि. ०२/०३/२०१७ पासूनचे व्याज आणि इतर आकार वगळून) ओसीसी- रु. २,७८,९०९.००/- (दि. ०२/०३/२०१७ पासूनचे व्याज आणि इतर आकार वगळून)
४	मालमत्तेचा तपशील	जमीन आणि इमारतीचे सर्वसामाईक भाग व हिस्से : सर्व्हे नं. ८७ (भाग), क्षेत्रफळ ५००.०० चौ.मी., गांव लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे-४१३११७ **आणि चतु:सीमा : उत्तरेस** : सिटी सर्व्हे नं. ८७ (भाग), **दक्षिणेस** : रस्ता, **पूर्वेस** : सिटी सर्व्हे नं. ८६, **पश्चिमेस** : सिटी सर्व्हे नं. ८८
५	**राखीव किंमत**	**रु. ११,२४,०००/-(रुपये अकरा लाख चोवीस हजार फक्त)**
६	ईमएडी (आरपीच्या १०%) बयाणा भरण्याची अंतिम तारीख	रु. १,१३,०००/- दि. २८/०९/२०२१
७	**अ) ऑक्शनचा मोड : ई-ऑक्शन, ब) ऑक्शन सर्व्हिस प्रोव्हायडरचा तपशील : मे. कॅनबँक कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेड (सीसीएसएल) नं. २एलबी, जे पी रॉयल,१ ला मजला, सॅमपिज रोड, मल्लेश्वरम्, बँगलोर, कर्नाटक, क) ऑक्शनची तारीख आणि वेळ : दि. ३० सप्टेंबर, २०२१, स.११.०० ते दु.१२.०० वा., ड) ऑक्शनची जागा : ऑनलाईन-ई ऑक्शन https://www.indianbankseauction.com**	

ई-लिलावाच्या नियम व अटी : विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ मध्ये नमूद केलेल्या विहीत अटींनुसारच होईल. आणि त्याखालील प्रमाणे :• मालमत्तेची विक्री **"जसे आहे जेथे आहे"** आणि **"जसे आहे जे आहे"** तत्वावर बोजासह जर असेल तर होईल बँकेच्या माहितीनुसार आजच्या तारखेपर्यंत कुठलाही बोजा नाही. • लिलाव 'ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग' मार्फत **https://www.indianbankseauction.com** या वेबसाईटवरून होईल. ई-लिलावाने विक्रीत भाग घेण्यापूर्वी प्रस्तावकांनी सविस्तर अटींसाठी वेबसाईटला भेट द्यावी. • अधिकृत अधिकाऱ्यांची पूर्वनियोजित वेळ घेऊन मालमत्तेची तपासणी करता येईल.• मालमत्ता आरक्षित किंमतीच्या खाली विकली जाणार नाही. प्रस्तावक त्यांची बोली लिलाव प्रक्रियेदरम्यान वाढवू शकतात. • आरक्षित किंमतीच्या १०% रक्कम बयाणा रक्कम म्हणून डिमांड ड्राफ्टने भरायची आहे. डीडी **Authorised Officer, Canara Bank,** बारामती शाखेचे नाव टाकून काढावा किंवा ही रक्कम RTGS/NEFT/Funds Transfer ने कॅनरा बँक, बारामती शाखेमध्ये खाते क्र ६९५२२९५०००००१ व आयएफएससी कोड CNRB0006952 टाकून दि. **२८ सप्टेंबर, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपूर्वी** जमा करावी. • इच्छुक प्रस्तावकांकडे इमेल आयडी व वैध डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. डिजिटल सिग्नेचरच्या तपशीलासाठी सेवा पुरवठादार **मे. कॅनबँक कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेड (सीसीएसएल) पत्ता-नं. २एलबी, जे पी रॉयल,१ ला मजला, समपिज रोड, मल्लेश्वरम्, बँगलोर, कर्नाटक ईमेल: eauction@cest.co.in,** फोन : ९४८०६९१७७७ /८५५३६४३१४४. यांच्याशी संपर्क करावा. प्रस्तावकाकडे वैध डिजिटल सिग्नेचर नसल्यास बयाणा रक्कम भरण्याच्या दिवशीच उपनिर्दिष्ट सेवापुरवठादाराशी संपर्क करावा. • बयाणा रक्कम भरल्यानंतर, प्रस्तावकांनी खालील कागदपत्रे / तपशील दि. **२८ सप्टेंबर, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्याआधी **कॅनरा बँक, संबंधित शाखा,** येथे हाती/पोस्टाने इमेल द्वारे द्यावीत. १) बयाणा रकमेचा डीडी / पे ऑर्डर. आरटीजीएस / एनईएफटी ने रक्कम भरली असल्यास यूटीआर नंबरसह त्याची पावती आणि बँकेचे नाव आणि शाखेचे नाव. २) पॅनकार्ड, ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा यांच्या छायाप्रती. यशस्वी प्रस्तावकांना निविदा रकमेच्या २५% रक्कम भरताना बँकेला या कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्या लागतील. ३) प्रस्तावकाचे नाव, संपर्क क्रमांक व पत्ता व इमेल आयडी ४) बयाणा रकमेच्या ऑनलाईन रिफंडसाठी प्रस्तावकाच्या बँक खात्याचा तपशील • इच्छुक प्रस्तावकांनी त्यांची नावे **https://indianbankseauction.com** या वेबसाईटवर नोंदवावीत व त्यांचे यूझर आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावेत. प्रस्तावकांना ई-लिलावाबाबतचे ऑनलाईन प्रशिक्षण सेवापुरवठादार **मे. कॅनबँक कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेड (सीसीएसएल) पत्ता-नं. २एलबी, जे पी रॉयल, १ ला मजला, सॅमपिज रोड, मल्लेश्वरम्, बँगलोर, कर्नाटक ईमेल: eauction@cest.co.in,** फोन : ९४८०६९१७७७ /८५५३६४३१४४.यांच्याकडून घेता येईल. • अयशस्वी प्रस्तावकांना बयाणा रक्कम विक्री नक्की झाल्यानंतर दोन दिवसात परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर कोणतेही व्याज असणार नाही. • लिलाव वर नमूद केल्याप्रमाणे आरक्षित किमतीला सुरु होईल. प्रस्तावकांना त्यांची बोली रू. १०,००० च्या पटीत वाढवता येईल. ऑनलाईन लिलावाच्या समाप्तीच्या वेळी ज्या प्रस्तावकाची बोली सर्वोच्च (आरक्षित किमतीच्या खाली नाही) असेल त्याला यशस्वी म्हणून घोषित करण्यात येईल. सुरक्षित धनकोची मंजूरी मात्र त्यासाठी आवश्यक आहे. • यशस्वी प्रस्तावकाने विक्री किमतीच्या २५% रक्कम (आधी भरलेली बयाणा रक्कम धरून) त्याला/तिला यशस्वी प्रस्तावक घोषित केल्यावर त्वरीत भरणे आवश्यक आहे. उर्वरित रक्कम धनकोने विक्री निश्चित केल्यावरच्या पंधरा दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. यशस्वी प्रस्तावकाने दिलेल्या वेळेत विक्री किंमत न भरल्यास कोणतीही सूचना न देता अधिकृत अधिकाऱ्यांकडून प्रस्तावकाचे डिपॉझिट जप्त केले जाईल आणि मालमत्ता पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल. • प्रवासखर्च, स्टँप ड्युटी, नोंदणी शुल्क इत्यादी खर्च यशस्वी प्रस्तावकानेच करावयाचा आहे. • कोणतेही कारण न देता ई लिलावाच्या नियम व अटींमध्ये बदल करण्याचा किंवा लिलाव पुढे ढकलण्याचा, रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे. • ज्या प्रस्तावकांना ई लिलावात भाग घ्यायचा आहे पण ज्यांना इंटरनेट उपलब्ध नाही त्यांनी विभागीय कार्यालय, किंवा संबंधित शाखेशी संपर्क साधावा. त्यांच्याकडून आवश्यक ती मदत केली जाईल. • पुढील माहितीसाठी **कॅनरा बँक, बारामती शाखा (फोन ०२११२-२२३९३९/७७५५९२६६२१),** ई-मेल cb4506@canarabank.com **किंवा सेवा पुरवठादार मे. कॅनबँक कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेड (सीसीएसएल) पत्ता- नं. २ एलबी, जे पी रॉयल, १ ला मजला, सॅमपिज रोड, मल्लेश्वरम, बँगलोर, कर्नाटक ईमेल: eauction@cest.co.in,** फोन : ९४८०६९१७७७ /८५५३६४३१४४.यांच्याशी संपर्क साधावा.

विशेष सूचना / इशारा – प्रस्तावकांनी अखेरच्या मिनिटाला किंवा सेकंदाला बोली लावणे टाळावे. हे त्यांच्याच फायद्याचे आहे. कुठल्याही प्रकारच्या अडचणींसाठी (इंटरनेट कनेक्शन जाणे, वीज जाणे इत्यादी) कॅनरा बँक वा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशी परिस्थिती टाळण्यासाठी प्रस्तावकांनी योग्य ती पर्यायी व्यवस्था (पॉवर बॅकअप इत्यादी) आधीच करून ठेवावी जेणेकरून त्यांना लिलावात यशस्वीरित्या भाग घेता येईल.

ठिकाण : पुणे
दिनांक : २६/०८/२०२१
(मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.)
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक